**धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई**

प्रायश्चित्तकाळातील **तिसरा रविवार ४ मार्च २०१८**

**श्रध्दावंतांच्या प्रार्थना**

**धर्मगुरूः** माझ्या बंधुभगिनींनो, आम्हाला सदैव प्रार्थना करण्याची गरज आहे आणि विशेषतः या प्रायश्चित्तकाळात तर अधिक प्रार्थना करण्याची गरज आहे ख्रिस्तासह एकनिष्ठेने आम्ही जागृत राहायला हवे आणि आमच्या स्वर्गीय पित्याकडे प्रार्थना करायला हवी.

**प्रतिसादः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१.ख्रिस्तसभेचे नेतृत्व करणा-या सर्वांना परमेश्वराची सुवार्ता इतरांपर्यंत पोहचविण्यास कृपा आणि चांगले आरोग्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२.आपल्या देशातील सर्व राज्यकर्त्यांवर परमेश्वराचा आशीर्वाद असावा लोकाहितासाठी त्यांनी सतत कार्यरत राहावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३.प्रभू येशूने समेरियन स्त्रीला जीवनाचे पाणी दिले.ख्रिस्त हा जो जिवंत पाण्याचा झरा आहे त्या ख्रिस्ताच्या कृपेने आपले जीवन संपन्न व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४.प्रत्येक मिस्साबलीदानातून आपल्या जीवनाची तहान भूक तृप्त होत असते. हया मिस्साबलिदानाची गोडी आपल्याला नियमितपणे निर्माण व्हावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५.आपल्या धर्मग्रामातील जे विदयार्थी निरनिराळया परिक्षेचा अभ्यास करीत आहेत त्यांच्यावर परमेश्वराची विशेष कृपा असावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरूः** हे प्रभो, तुझे लोक पुन्हा तुझ्याकडे येवोत आणि संपूर्ण अंतःकरणाने ते तुझी सेवा करोत. श्रध्देने आम्ही तुझ्या साहाय्याची याचना केली आहे. आता आमच्या जीवनात तुझ्या दयेची आणि प्रेमाची जाणीव करून दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

**धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई**

**जागतिक महिला दिन ८ मार्च २०१८**

**विश्वासू लोकांच्या प्रार्थना**

**प्रतिसादः प्रभो आमची प्रार्थना ऐक.**

१.ख्रिस्तसभेचे नेतृत्व करणा-या सर्वांना परमेश्वराची सुवार्ता इतरांपर्यंत पोहचविण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२.प्रभू येशूने समेरियन स्त्रीला जीवनाचे पाणी दिले.ख्रिस्त हा जो जिवंत पाण्याचा झरा आहे त्या ख्रिस्ताच्या कृपेने आपले जीवन संपन्न व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३.सर्वसमर्थ परमेश्वराने जगभरातील सर्व स्त्रियांना, विशेष करून ज्या स्त्रिया मानसिक व शारीरिक छळाल,ाा सामोरे जात आहेत अशांना त्याच्या विशेष कृपेने संपन्न करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४.आपल्या धर्मग्रामातील सर्व स्त्रियांना प्रभूने चांगल्या आरोग्याची देणगी दयावी व त्यांच्या सर्व इच्छा प्रभूच्या कृपेने पूर्ण व्हाव्यात म्हणून आपण प्रार्थना करू या.

५.आपल्या धर्मग्रामातील जे जे विदयर्थी १0 वी / १२ वी व इतर परिक्षेला सामोरे जात आहेत त्यांच्यावर परमेश्वराची विशेष कृपा असावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई**

प्रायश्चित्तकाळातील **चौथा रविवार ११ मार्च २०१८**

**श्रध्दावंतांच्या प्रार्थना**

**<u>धर्मगुरूः</u>** माझ्या बंधुभगिनींनो, आम्हाला सदैव प्रार्थना करण्याची गरज आहे आणि विशेषतः या प्रायश्चित्तकाळात तर अधिक प्रार्थना करण्याची गरज आहे ख्रिस्तासह एकनिष्ठेने आम्ही जागृत राहायला हवे आणि आमच्या स्वर्गीय पित्याकडे प्रार्थना करायला हवी.

**प्रतिसादः प्रभो आमची प्रार्थना ऐक.**

१.ख्रिस्तसभेचे नेतृत्व करणा-या सर्वांना परमेश्वराची सुवार्ता इतरांपर्यंत पोहचविण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२.सर्व राजकिय नेत्यांना देशाचा कारभार सुरळतिपणे चालवण्यास व जनतेच्या हितासाठी कार्यरत राहण्यास प्रेरणा मिळवी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३.हया उपवासकाळात आपणा सर्वांना परमेश्वराचा जवळून अनुभव यावा त्याद्वारे आपले परिवर्तन घडावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४.आम्ही स्वतः पश्चाताप करण्यास शिकावे व संपूर्ण अंतःकरणाने आम्ही पापांचा त्याग करण्यास कृपा लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आम्हामधील प्रत्येकाने स्वहित बाजूला ठेवण्यास शिकावे आणि प्रेमाने आपल्या बंधूभगिनींची सेवा करावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**<u>धर्मगुरूः</u>** हे प्रभो, तुझे लोक पुन्हा तुझ्याकडे येवोत आणि संपूर्ण अंतःकरणाने ते तुझी सेवा करोत. श्रध्देने आम्ही तुझ्या साहाय्याची याचना केली आहे. आता आमच्या जीवनात तुझ्या दयेची आणि प्रेमाची जाणीव करून दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

**धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई**

प्रायश्चित्तकाळातील **पाचवा रविवार १८ मार्च २०१८**

**श्रध्दावंतांच्या पार्थना**

**धर्मगुरू** : माझ्या बंधुभगिनींनो, येशूचा पुनरूस्थानदिन जवळ येत आहे. दुखःसहन, मरण आणि पुनरूस्थान यांद्वारे स्नानसंस्कार घेतलेल्या आम्हाला आणि अखंड जगाला ख्रिस्ताच्या जीवनात अधिक सहभाग मिळावा म्हणून आपण प्रभूकडे मनःपूर्वक प्रार्थना करू या.

**प्रतिसादः हे प्रभो आमची प्रार्थना ऐक.**

१.ख्रिस्तसभेचे नेतृत्व करणा-या पोप फ्रान्सिस, सर्व बिशप्स, धर्मगुरू, धर्म भगिनी, व्रतस्थ धर्मबंधू हया सर्वांना परमेश्वराची सुवार्ता इतरांपर्यंत पोहचविण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२.आपल्या देशात सर्वत्र शांतीचे वातावरण असावे सर्व राजकिय नेत्यांना जनतेच्या हितासाठी कार्यरत राहण्यास प्रेरणा मिळवी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३.असहाय्य आणि निराश्रित लोकांना शांती आणि सुरक्षिततेचे वरदान लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४.आपल्या धर्मग्रामातील प्रत्येक कुटुंबावर परमेश्वराचा विशेष आशीर्वाद असावा आपल्या कुटुंबात नेहमी प्रेमाचे व सहकार्याचे वातावरण असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५.दुःखीकष्टी आणि मोहात पडलेल्या लोकांना परमेश्वराच्या कृपेने सामर्थ्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू** : हे स्वर्गीय पित्या, या तुझ्या गरजवंत ख्रिस्तसभेवर दया कर. संपूर्ण अंतःकरणाने आम्ही या प्रार्थना तुला अर्पण करीत आहोत. त्यांचा तू स्वीकार कर. तुझ्या जीवनात सहभागी होणाया लोकांचा कधीही त्याग करू नकोस. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

**धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई**
**झावळयांचा रविवार २५ मार्च २०१८**
**श्रध्दावंतांच्या प्रार्थना**

**<u>धर्मगुरू :</u>** माझ्या बंधुभगिनींनो, येशूचा पुनरूत्थानदिन जवळ येत आहे. दुःखःसहन, मरण आणि पुनरूत्थान यांद्वारे स्नानसंस्कार घेतलेल्या आम्हाला आणि अखंड जगाला ख्रिस्ताच्या जीवनात अधिक सहभाग मिळावा म्हणून आपण प्रभूकडे मनःपूर्वक प्रार्थना करू या.
**प्रतिसादः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१.आपले पोप, कार्डिनल्स, बिशप्स, धर्मगुरू धर्मबंधू व सिस्टर्स हयांनी आपणांस प्रभूच्या प्रेमाचा व शांतीचा संदेश देऊन आपणांस परमेश्वराच्या जवळ येण्यास मार्गदर्शन करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.
२.आज प्रभू आपल्या राजवैभवात जेरूसालेम नगरी प्रवेश करतो. लोक हर्षाने व आनंदाने राज्यांच्या राजाचे भव्यदिव्य स्वागत करतात. प्रभूच्या सामर्थशाली वैभवाचा हया पवित्र आठवडयात आपणास जवळून अनुभव यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.
३.मनुष्य आपल्या जीवनात परिपूर्ण नसतो. तरीही आपले स्वतःचे दोष लपवून तो इतरांचे दोष दाखवित असतो. स्वतःच्या जीवनाचे आत्मपरिक्षण करून आदर्श जीवन जगण्यास आपणास प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.
४.दुःख वेदना संकटे हे प्रत्येकाच्या जीवनाचा भाग आहे आपल्या दुःखाकडे आपणांस नेहमी सकारात्मक दृष्टीने पाहता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.
५.येणा-या पवित्र आठवडयात आपणास परमेश्वराच्या सान्निध्यात अधिकाधिक वेळ घालविता यावा व त्याद्वारे स्वतःच्या जीवनावर सखोल चिंतन करता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.
**<u>धर्मगुरू</u>** : हे स्वर्गीय पित्या, या तुझ्या गरजवंत ख्रिस्तसभेवर दया कर. संपूर्ण अतःकरणाने आम्ही या प्रार्थना तुला अर्पण करीत आहोत. त्यांचा तू स्वीकार कर. तुझ्या जीवनात सहभागी होणाया लोकांचा कधीही त्याग करू नकोस. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.